
(छाया : अमित चक्रवर्ती)



'ये है मुंबई मेरी जान' या पुस्तकाचे प्रकाशन गुरबक्षसिंग कोहली, नितीन आरेकर, गिरीश कुबेर, सुशीलकुमार शिंदे, भगतसिंह कोश्यारी, मोहिंदरकौर कोहली, अमरदीपसिंग कोहली, पी. एस. पसरिचा, डॉ. सदानंद बोरसे यांच्या उपस्थितीत झाले.

### राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या भावना; 'लोकरंग'मधील 'ये है मुंबई मेरी जान' सदर पुस्तकरूपात प्रकाशित

# कुलवंतसिंग यांच्याकडून अनेकांच्या स्वप्नांना बळ!

**प्रतिनिधी, मुंबई**

''**काही लोक** आपली छाप सोडून जातात. त्यापैकी एक कुलवंतसिंग कोहली होते. प्रतिकूल परिस्थितीत मुंबईत आलेल्या कोहली कुटुंबाने स्वतःचे स्थान निर्माण केले आणि मुंबईचा अविभाज्य भाग झाले. मुंबईत येऊन मोठे झालेले अनेक जण आहेत, मात्र कुलवंतसिंग यांनी स्वतःबरोबर अनेकांच्या स्वप्नांना बळ दिले आणि याची जाण ठेवून मुंबईकरांनीही त्यांना प्रेम दिले,'' अशा भावना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी गुरुवारी व्यक्त केल्या. 'लोकसत्ता'मध्ये गेले वर्षभर प्रसिद्ध झालेल्या कोहली यांच्या 'ये है मुंबई मेरी जान' या सदरातील लेखसंग्रहाच्या प्रकाशनावेळी कोश्यारी बोलत होते.

या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवारी कोश्यारी यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, राज्याचे निवृत्त पोलीस महासंचालक डॉ. पी. एस. पसरिचा, राजहंस प्रकाशनाचे डॉ. सदानंद बोरसे, 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर, लेखक नितीन आरेकर, स्वर्गीय कुलवंतसिंग कोहली यांच्या पत्नी मोहिंदरकौर कोहली, पुत्र अमरदीपसिंग आणि गुरबक्षसिंग कोहली यांसह मुंबईतील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

या वेळी शिंदे म्हणाले, ''कोहली आणि माझे ऋणानुबंध हे १९७६ पासून आहेत. चंदेरी दुनियेमागील वास्तव कोहली यांनी जवळून पाहिले. अनेकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. झगमगाटापलीकडे असलेले अनेक कलाकारांचे, दिग्गजांचे आयुष्य कोहली यांनी 'ये है मुंबई मेरी जान'च्या माध्यमातून मांडले. हे पुस्तक क्षणिक आनंदासाठी वाचण्याचे नाही, तर ते जीवनमूल्य शिकवणारे आहे. ती मूल्ये पापाजींनी (कोहली) आत्मसात केली होती. अनेकांची आयुष्ये त्यांनी उभी केली. मात्र ते कायम नम्र राहून माणसे जोडत राहिले.''

पुस्तकाचे लेखक नितीन आरेकर यांनी साप्ताहिक सदरापासून ते पुस्तकापर्यंतचा प्रवास उलगडला. ''कोहली यांच्यासारख्या दिलदार माणसाची भेट हा आयुष्य समृद्ध करणारा अनुभव होता,'' अशा भावना आरेकर यांनी व्यक्त केल्या.

कोहली यांच्याबरोबरील भेटीचा 'प्रीतम योगायोग' सांगून कुबेर म्हणाले, ''माणसांना सामावून घेणारे, आपलेसे करणारे कुलवंतसिंग हे 'भारत' या संकल्पनेचे मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांची भेट ही माझ्यासाठी आयुष्यातील संस्मरणीय संध्याकाळ होती.'' डॉ. बोरसे आणि डॉ. पसरिचा यांनीही या वेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**आठवणींना उजाळा...**

रावळपिंडीहून येऊन मुंबईला आपलेसे करणारे कुलवंतसिंग कोहली हे मुंबईतील अनेक बदलांचे, अनेक दिग्गजांच्या आयुष्याचे साक्षीदार. मुंबईकरांच्या भावना आणि आठवणींचा खजिना सांभाळणाऱ्या 'प्रीतम' हॉटेलचे मालक असलेल्या कुलवंतसिंग कोहली यांचे अनुभव, आठवणी आणि अनेक दिग्गजांचे पडद्यामागील आयुष्य हे 'लोकसत्ता'ने सर्वप्रथम वाचकांसमोर आणले. 'लोकरंग' पुरवणीत २०१८ मध्ये दर आठवड्याला 'ये है मुंबई मेरी जान' हे कोहली यांचे सदर प्रसिद्ध करण्यात येत होते. प्रा. नितीन आरेकर यांनी या सदराचे शब्दांकन केले होते. या सदरातील लेख राजहंस प्रकाशनाने पुस्तकरूपाने प्रकाशित केले आहेत.

# बांधकाम उद्योगात दहा टक्के रोखीसाठी विकासक आजही आग्रही!

### 'सरकारी बाबूंना' लाच देण्यासाठी हवी रोकड

**निशांत सरवणकर, मुंबई**

**बांधकाम उद्योगात** मोठ्या प्रमाणात रोख व्यवहाराला असलेले महत्त्व निश्चलनीकरणानंतर बंद होईल, असा दावा केला गेला तरी आजही या उद्योगात सरकारी बाबूंना लाच देण्यासाठी विकासकांना सदनिकेच्या एकूण किमतीच्या पाच ते दहा टक्के रोख रकमेचा आग्रह धरावा लागत आहे. याबाबत उघडपणे काहीही सांगण्यास विकासक नकार देत असले तरी खासगीत मात्र ही बाब ते मान्य करीत आहेत.

**निश्चलनीकरणाची तीन वर्षे**

निश्चलनीकरणाला तीन वर्षे पूर्ण होत आली आहेत. काळा पैसा रोखणे ही यामागे प्रमुख भूमिका होती. बांधकाम उद्योगातील काळ्या पैशाला या तीन वर्षांच्या काळात आळा बसल्याचे दिसत आहे. याआधी विकासक ४० टक्के रक्कम रोखीने स्वीकारीत होते. सदनिकेच्या किमतीवर बाजारभावाने मुद्रांक शुल्क आकारण्याचे ठरल्यानंतर त्याला आळा बसला होता. तरीही काही विकासकांकडून ३० ते ४० टक्के रक्कम रोखीच्या स्वरूपात स्वीकारली जात होती. आता निश्चलनीकरणानंतर ती दहा ते पाच टक्क्यांवर आली आहे. मात्र रोख रक्कम स्वीकारण्यावर विकासकांचा आजही आग्रह दिसत आहे.

प्रकल्प मंजुरीसाठी सरकारी बाबूंना लाचेपोटी द्यावी लागणारी रक्कम ही रोख स्वरूपातच द्यावी लागते. त्यातच बँकेतून रोख रक्कम काढण्यावर बंधने आल्यामुळे आम्हाला घरांची विक्री करताना खरेदीदाराकडून रोख रक्कम स्वीकारावी लागत आहे. बऱ्याच वेळा पार्किंगसाठी आम्ही रोखीने रक्कम स्वीकारतो, असेही काही विकासकांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.



**बेनामी सदनिकांची संख्या घटली**

निश्चलनीकरणाचा सर्वात मोठा फटका बांधकाम उद्योगाला बसला आहे. याआधी रोख रक्कम देऊन गुंतवणूकदार विकासकाकडे काही सदनिका कमी किमतीत खरेदी करीत होते. त्याला आता पूर्णपणे आळा बसला आहे. बेनामी सदनिकांची संख्या चांगलीच कमी झाल्याचेही या विकासकांनी मान्य केले. बांधकाम उद्योगात आता प्रामुख्याने सदनिकेची किंमत बाजारभावानुसार स्वीकारताना संपूर्ण रक्कम धनादेशाद्वारे स्वीकारण्याकडे अनेक बड्या विकासकांचा कल दिसून येत आहे. काही खरेदीदार रोख रक्कम देऊ करतात तेव्हा ती आम्ही स्वीकारतो. आम्हाला लाचेची रक्कम देण्यासाठी रोकड हवी असते, असेही या विकासकांनी सांगितले.

"निश्चलनीकरणामुळे रोख रक्कम उपलब्ध होणे बंद झाल्याने अनेक गृहप्रकल्प दिवाळखोरीत गेले. त्यातच रेरा कायदा आणि वस्तू व सेवा कराचा फटका हीदेखील कारणे आहेत. मात्र आता हळूहळू बांधकाम उद्योगही जोर पकडत आहे.

– मुदस्सीर झैदी, कार्यकारी संचालक, नाईट फ्रँक

"गेल्या तीन वर्षांत बांधकाम उद्योगात पारदर्शकता आली. आता वेळेत प्रकल्प पूर्ण करून नफा कमावणे हाच विकासकांचा उद्देश असेल. त्याचा फायदा ग्राहकांना मिळेल.

– मंजू याज्ञिक, नहार समूह आणि उपाध्यक्ष, नरेडको

"निश्चलनीकरणासारख्या उपायांची आवश्यकता होती. त्याचा फटका निश्चित बसला. मात्र आता हा व्यवसाय अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार आहे.

– अशोक मोहनानी, अध्यक्ष, एकता वर्ल्ड तसेच उपाध्यक्ष, नरेडको.

### तुतारी एक्स्प्रेसला कायमस्वरूपी चार जादा डबे

**मुंबई :** कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी पाहता दादर-सावंतवाडी तुतारी एक्स्प्रेसला जादा डबे जोडण्यात येणार असल्याची माहिती मध्य व कोकण रेल्वेने दिली. या गाडीला कायमस्वरूपी चार जादा डबे जोडण्यात येणार आहेत. सोमवार, ११ नोव्हेंबरपासून चार अतिरिक्त डबे जोडलेली तुतारी एक्स्प्रेस धावणार आहे. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गाडी क्रमांक ११००३-०४ दादर-सावंतवाडी-दादर तुतारी एक्स्प्रेसला जोडण्यात येणाऱ्या डब्यांमधे वातानुकूलित थ्री टियर आणि स्लीपर श्रेणीतील प्रत्येकी एक आणि जनरल द्वितीय श्रेणीतील दोन डबे असणार आहेत.

# माणगावमध्ये तिहेरी हत्याकांड

### किरकोळ वादातून पतीकडून पत्नी आणि दोन मुलांची हत्या

**खास प्रतिनिधी, अलिबाग**

**किरकोळ वादातून** एकाने पत्नीसह दोन मुलांची हत्या केल्याची घटना माणगाव तालुक्यातील दहिवली येथे बुधवारी रात्री घडली. सुहानी शिंदे (वय ३६), पवन शिंदे (वय ५) आणि संचित शिंदे (वय २) अशी मृतांची नावे आहेत. गोरेगाव पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणी पोलिसांनी आरोपी संतोष शिंदे याला ताब्यात घेतले आहे.

मोलमजुरी करणाऱ्या शिंदे दाम्पत्यामध्ये किरकोळ कारणांवरून नेहमी वाद होत. बुधवारी रात्री दोघांमधील वाद विकोपाला गेला. राग अनावर झाल्यामुळे संतोषने पत्नीसह दोन्ही मुलांची नायलॉनच्या दोरीने गळा आवळून हत्या केली.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शशीकिरण काशिद आणि पोलीस निरीक्षक अनिल टोम्पे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच आरोपी संतोष याला ताब्यात घेत हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, घटनास्थळी दाखल झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी संचित शिंदे याला तातडीने माणगावमधील रुग्णालयात दाखल केले. मात्र, तपासणीअंती त्याला मृत घोषित करण्यात आले.

**पोलीस पाटलांकडे कबुली**

पत्नी आणि दोन मुलांची हत्या केल्यानंतर आरोपी संतोष शिंदे रात्री घरीच झोपी गेला. सकाळी पावणेदहा वाजता त्याने पोलीस पाटील चंद्रकांत चेरफळे यांना घडला प्रकार सांगितला. रोजच्या भांडणाला कंटाळून आपण पत्नी आणि मुलांना ठार मारल्याची कबुली त्याने दिली. पोलीस पाटलांनी त्याच्या घरी जावून खातरजमा केली. त्यानंतर गोरेगाव पोलिसांना घटनेची माहिती दिली.

TATA

**TATA STEEL LIMITED**

**Registered Offce:** Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

**३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेली तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशिल | ३०.०९.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१९ रोजी संपलेले सहा महिने | ३०.०९.२०१८ रोजी संपलेले सहा महिने | ३१.०३.२०१९ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | १४,८७१.१८ | १६,०९१.३२ | १७,९०२.०४ | ३०,९६२.५० | ३४,३०७.५० | ७०,६१०.९२ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | १,८९१.३७ | २,४४३.९० | ५,०४३.७५ | ४,३३५.२७ | ८,९५१.६१ | १६,३४१.४८ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | १,८८८.७९ | २,४०३.१५ | ५,०१५.५६ | ४,२९१.९४ | ८,५८८.७३ | १६,२२७.२५ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ३,८३७.८१ | १,५३८.९९ | ३,२६७.८६ | ५,३७६.८० | ५,५८६.०१ | १०,५३३.१९ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ३,७५९.८४ | १,४८९.४३ | ३,२६१.३६ | ५,२४९.२७ | ५,६०१.९८ | १०,४८२.९७ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | | | ६९,३०८.५९ |
| नेटवर्थ | | | | ७६,०९१.९४ | ६७,९३४.२४ | ७२,७२९.७१ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | | | | १२,२९६.७८ | १०,४३८.९३ | १४,३४६.४१ |
| निव्वळ कर्ज इक्विटी गुणोत्तर | | | | ०.४० | ०.३५ | ०.४२ |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)–रुपयांत (अपवादात्मक बाबीनंतर) | ३३.०० | १३.०५ | २८.१४ | ४६.०५ | ४७.९९ | ९०.४१ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)–रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ३३.०० | १३.०५ | २८.१३ | ४६.०५ | ४७.९८ | ९०.४० |
| डिबेंचर विमोचन राखीव | | | | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज गुणोत्तर | | | | १.५४ | ८.८१ | ६.२३ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज गुणोत्तर | | | | ४.७० | ११.६५ | ९.५७ |

**३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेली तिमाही/सहा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा**

₹ कोटी

| तपशिल | ३०.०९.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१९ रोजी संपलेले सहा महिने | ३०.०९.२०१८ रोजी संपलेले सहा महिने | ३१.०३.२०१९ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ३४,५७९.१८ | ३५,९४७.११ | ४०,८९७.१६ | ७०,५२६.२९ | ७६,३९१.२४ | १,५७,६६८.९९ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | २७.०२ | १,८०३.०१ | ५,२४७.३३ | १,८३०.०३ | ८,५९४.७६ | १६,०२६.६९ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | (६.५४) | १,८१९.०१ | ५,४११.१० | १,८१२.४७ | ८,४२९.८९ | १५,९०५.७२ |
| अखंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ४,०४३.४५ | ६९५.१९ | ३,०९४.३२ | ४,७३८.६४ | ५,०१७.१७ | ९,१८७.२९ |
| खंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | (७४१.१४) | १८.८४ | २१.८८ | (७२२.३०) | ३२.८३ | (८८.९६) |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ४,४८३.११ | ३८८.२३ | १,३०५.४५ | ४,८७१.३४ | ४,९८६.४७ | ९,१०६.१२ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४४.९४ | १,१४४.९४ | १,१४४.९३ | १,१४४.९४ | १,१४४.९३ | १,१४४.९४ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रित व्याज | | | | | | ६७,८६९.६० |
| नेट वर्थ | | | | ७५,३०३.०२ | ६७,६०५.४१ | ७१,२८९.५४ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)–रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ३५.७१ | ५.७३ | ३०.८८ | ४१.४५ | ४७.४५ | ८८.३२ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)–रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ३५.७१ | ५.७३ | ३०.८७ | ४१.४४ | ४७.४४ | ८८.३१ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)–रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २९.२५ | ५.८८ | ३१.०७ | ३५.१४ | ४७.७३ | ८७.७५ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)–रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २९.२५ | ५.८८ | ३१.०६ | ३५.१३ | ४७.७२ | ८७.७४ |

**टीपा :**

ए) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

बी) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ५२ (४) च्या पोट–खंड (ए), (बी), (डी) व (ई) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींसाठी महत्त्वाची माहिती एनएसई आणि बीएसई (www.nseindia.com/www.bseindia.com) ला दिली आहे आणि ती युआरएल (www.tatasteel.com) वर पाहता येईल.

**टी. व्ही. नरेंद्रन**
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक
मुंबई : ०६ नोव्हेंबर, २०१९

**कौशिक चॅटर्जी**
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

TATA STEEL

NSE Clearing

**NSE Clearing Limited**

( Formerly known as NATIONAL SECURITIES CLEARING CORPORATION LIMITED )

CIN: U67120MH1995PLC092283

**Regd. Off.:** "EXCHANGE PLAZA", Plot No. C/1, G-Block, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai - 400051, India

**Extract of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Half year ended September 30, 2019**

**( ₹ in Crores unless otherwise indicated)**

| Sr. No. | Particulars | Standalone | | | Consolidated | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended 30-Sept-2019 | Half Year Ended 30-Sept-2019 | Quarter Ended 30-Sept-2018 | Quarter Ended 30-Sept-2019 | Half Year Ended 30-Sept-2019 | Quarter Ended 30-Sept-2018 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) |
| 1 | Total income from operations | 85.68 | 169.05 | 80.31 | 85.68 | 169.05 | 80.32 |
| 2 | Net Profit for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 71.85 | 145.05 | 66.11 | 69.95 | 141.47 | 64.33 |
| 3 | Net Profit for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 71.85 | 145.05 | 66.11 | 69.95 | 141.47 | 64.33 |
| 4 | Net Profit for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 50.73 | 104.19 | 42.97 | 48.83 | 100.61 | 41.19 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 50.69 | 103.79 | 42.99 | 50.06 | 101.56 | 44.69 |
| 6 | Equity Share Capital | 45.00 | 45.00 | 45.00 | 45.00 | 45.00 | 45.00 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Balance Sheet of previous year | | 443.87 | | | 419.89 | |
| 8 | Earnings per equity share (FV ₹ 10 each) (before contribution to Core SGF) - Basic and Diluted ( ₹ ) * | 11.27* | 23.15* | 9.55* | 10.85* | 22.36* | 9.15* |
| | * Not annualised | | | | | | |

Note :


1. The above is an extract of the detailed format of Standalone and consolidated Quarterly and Half yearly Financial Results pursuant to Regulation 35 of Securities Contracts (Regulation) (Stock Exchange and Clearing Corporations) Regulations, 2018, as amended from time to time, read with Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Standalone and consolidated Quarterly and Half yearly Financial Results are available on the website www.nscclindia.com.
2. The above Standalone and Consolidated financial results for quarter and Half year ended September 30, 2019 have been reviewed by the Audit Committee in its meeting and approved by the Board of Directors in its meeting held on November 06, 2019. The Statutory Auditors have conducted the Limited Review of the same.

For and on behalf of the Board of Directors

Place : Mumbai
Date : November 06, 2019

VIKRAM KOTHARI
Managing Director
[ DIN : 07898773 ]

# चैतन्य साधना ब्रह्मकुमारीज



बी. के. नीताबेन

## जीवनाचे मर्म

जीवन गाणे गातच रहावे,
झाले-गेले विसरून जावे,
पुढे-पुढे चालावे ......

बालपणापासून वृद्धावस्थेपर्यंतचा आपल्या सर्वांचा प्रवास न थांबणारा आहे. जीवनामध्ये अनेक प्रसंग, समस्या ...... आल्या. कदाचित आपण थांबलोही असू परंतु घड्याळाचे काटे पुढे सरकतच राहिले. ह्या प्रवासात काही मिळाले, काही नकळत सुटले पण तरी काही मिळवण्याची आशा आजही आहे. निसर्गाच्या लयीबरोबर स्वतःची ताल मिळवण्याचा प्रयत्न मात्र आपण सतत करत आहोत.

निसर्गाच्या शाश्वत नियमानुसार जिथे जन्म तिथे मृत्यू हा आहेच, जी वस्तू बनली आहे ती समाप्त होणारच आहे ...... परीवर्तन होतच राहिल. आपण जीवनाच्या प्रवासाला थोडसं थांबून बघू या. बालपणापासून ज्याच्या हाता-खांद्यावर खेळलो, आज ते माणसाच्या गर्दीत कुठे हरवले ते समजत ही नाही. ज्या लोकांवर, वस्तूंवर...... आपण खूप प्रेम केले आज कदाचित ते सर्व आपल्या दृष्टिक्षेपातही नाहीत. कधीतरी कोणाबरोबर केलेली मेजवानी, समुद्रांच्या लाटांमध्ये केलेली मस्ती, एखादया स्पर्धेमध्ये भाग घेऊन मिळवलेले बक्षीस किंवा शाळा-कॉलेजामध्ये नृत्य - नाटकामध्ये केलेले काम...... अश्या असंख्य आठवणी आपल्या स्मृतिकोषात दडून बसल्या आहेत. जे क्षण अनुभवले ते मात्र आज भूतकाळाच्या पडद्याआड लपून गेले. सर्वच काळाअनुसार बदलत गेले. Life is a journey म्हटले जाते. कधी-कधी स्वतःलाच प्रश्न विचारते कि हा प्रवास फक्त शरीराचा आहे कि ...... ? गीतेमध्यें उल्लेख आहे कि शरीर नश्वर परंतु आत्मा अमर आहे . मग हा प्रवास शरीराचा कि आत्म्याचा ? शरीररूपी गाडीमध्ये बसून आत्मा प्रवास करत आहे. ज्याला आपण जीवन म्हणतो. ह्या कर्मेंद्रियांद्वारे मी यात्रा करत आहे. जसे ट्रेनमध्ये खिडकीजवळ बसून आपण बाहेरची दृश्ये बघत असतो तसेच आत्मा शरीररूपी गाडीमध्ये बसून डोळ्यांच्या खिडकीद्वारे सारे जग बघत आहे. चांगले-वाईट सर्व काही मनाच्या संग्रहालयात जमा करून ठेवतो. हा संग्रह फक्त एक जन्माचा नाही परंतु अनेक जन्माचा आहे. कधी-कधी एखादया ठिकाणी जातो किंवा एखादया व्यक्तीला भेटतो तेव्हा मनामध्ये कुठेतरी हा विचार येऊन जातो कि ह्या व्यक्तिला, या स्थानाला पहिले सुद्धा बघितले आहे. पुसटच्या स्मृति मानसपटलावर येऊन जातात. खरतर आपण सर्वच या सृष्टीरूपी रंगमंचाचे कलाकार आहोत. शरीररूपी ड्रेस बदलून आपण अनेक वेळा अनेक संबंधांनी एकमेकांना भेटलो आहोत. परंतु मृत्यू एक असा प्रसंग आहे कि जेणेकरून आपण त्या जन्माचे सर्व काही विसरून नव्याने शरीर धारण करून वेगळी भूमिका सादर करतो.

ह्या कर्मक्षेत्रावर जे बीज पेरले तेच आपल्याला मिळते. सुख-दुःख ही आपल्याच कर्माची फळे आपण प्राप्त करतो. ह्या डोळ्यांनी दिसणारी प्रत्येक वस्तू कालांतराने बदलत राहते. पण आत्मा स्वतःबरोबर फक्त आपली कर्मांची पुंजी घेऊन जाते. म्हणूनच एखाद्याचा जन्म अतिशय धनाढ्य घरामध्ये होतो तर कोणाचा साधारण कुटुंबामध्ये, कोणी बुध्दीवान तर कोणी बुद्धीहीन, कोणी सुंदर तर कोणी कुरूप ...... अनेक तऱ्हा आपण बघतो. आत्मा आपल्याच कर्मांच्या जाळ्यात अडकते. तो पर्यंत कर्मबंधन सुटत नाहीत तोपर्यंत आत्म्याची सुख-दुःखाच्या, जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सुटका होत नाही.

हा प्रवास शरीराचा नाही परंतु आत्म्याचा आहे जो अविरत चालत राहतो. जे काही मिळाले आहे ते सर्वच आज नाहीतर उद्या सोडायला लागेल म्हणून आपण प्रत्येक परिवर्तनासाठी तयार रहावे. ह्या प्रवासात सर्व काही बदलत राहणार आहे. आपण मात्र आपल्या कर्मांवर लक्ष ठेवावे कारण पाप-पुण्याचे गाठोडे आपल्या सोबत जाणार आहे. ते गाठोडे प्रत्येकाला स्वतः उचलावे लागते. ह्या गाठोड्याला वजन नाही परंतु त्या अनुसार आत्मा मजा किंवा सजा यांचा अनुभव करते. म्हणून रोज आपण आपल्याच कर्मांचे दर्शन नीट करावे. दिवसभरामध्ये कोणाला दुःख तर नाही दिले, अपशब्द तर नाही बोललो किंवा एखाद्याबद्दल वाईट विचार तर नाही आला? प्रत्येक कर्मांची सजा परोक्ष किंवा अपरोक्ष रित्या आपल्याला मिळत असते. म्हणून सावधान'.

आपल्याच कर्मांची छाप आपल्यावर पडत राहते आणि ऋणानुबंध वाढत जातात. जीवनाच्या गगनामध्ये मुक्त पक्षी बनून उडायचे असेल तर प्रत्येक कर्मरूपी पाऊल सावधरित्या टाका.

क्रमशः



आपद्ग्रस्त मच्छीमारांना मदत मिळण्यासाठी कोळी महासंघाने राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेऊन निवेदन दिले.

# मच्छीमारांना २१०० कोटींची नुकसान भरपाई मिळण्यासाठी समिती गठीत करणार

## राज्यपालांचे कोळी महासंघाला आश्वासन

**प्रतिनिधी**

मुंबई, गुरुवार- राज्यातील कोकण किनारपट्टीवरील मासेमारांवर आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे आपद्ग्रस्त झालेल्या मच्छीमारांना २१०० कोटी रुपये सानुग्रह मदत द्यावी, अशी आग्रही मागणी कोळी महासंघाच्या वतीने केली.त्यासाठी राज्यस्तरावर समिती गठीत करणार असल्याचे आश्वासन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी आज कोळी महासंघाच्या शिष्टमंडळाला दिले.

कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि भाजपासाज विधान परिषद सदस्य रमेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कोळी महासंघाच्या शिष्टमंडळाने आज सकाळी राजभवन येथे राज्यपालांची भेट घेतली.

त्यावेळी राज्यपालांनी सदर आश्वासन दिले.

या प्रसंगी कोळी महासंघाचे सरचिटणीस राजहंस टपके, कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी, युवा अध्यक्ष अँड चेतन पाटील ,महिला अध्यक्षा राजश्री भानजी , विशाल पाटील, सचिन पागधरे ,मनीष पिकले आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यात २८ हजार मासेमारी नौका असून २० हजार मच्छीमार नौका बंदरावरच परत आल्या, या नैसर्गिक आपत्तीमुळ मच्छिमारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.मासेमारीवर झालेला खर्च, डिझेल , बर्फ, खलाशी या सयंत्रणेवर अवलंबून असणारा कष्टकरी समाजाला मोठा आर्थिक फटका बसला आहे अशी माहिती आमदार रमेश पाटील यांनी राज्यपालांना दिली.

सहा सिलेंडर मासेमारी नौकेपासून एकेरी मासेमारी करणारा पारंपारिक मच्छिमारांचे झालेले नुकसान लक्षात घेऊन त्यांना सानुग्रह मदत मिळावी यासाठी संपूर्ण कोकण किनारपट्टीवर कोळी महासंघाने आढावा घेतला होता.त्या अनुषंगाने २१०० कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळावी असे निवेदन राज्यपालांना दिले अशी माहिती आमदार रमेश पाटील यांनी दिली.

यासाठी मच्छीमारांच्या प्रतिनिधींसह राज्यस्तरीय समिती गठीत करून मच्छीमारांना मदत आणि पुनर्वसन केले जाईल असे आश्वासन राज्यपालांनी यावेळी दिल्याची माहिती त्यांनी दिली.

# काँग्रेसचे आमदार विश्वजीत कदम अपघातातून वाचले

**प्रतिनिधी**

पुणे, दि. ८ (प्रतिनिधी)-काँग्रेसचे कार्याध्यक्ष आणि सांगलीतील आमदार डॉ.विश्वजीत कदम कार अपघातातून थोडक्यात बचावले आहेत. विश्वजीत कदम यांच्या गाडीला बुधवारी रात्री पुण्यात मोठा अपघात झाला.

सुदैवाने विश्वजीत कदम अपघातातून बालंबाल बचावले. अपघातात गाडीचं मोठं नुकसान झालं आहे. मात्र विश्वजीत कदम यांना गंभीर दुखापत झालेली नाही. अपघातानंतर विश्वजीत कदम कराडच्या दिशेने रवाना झाले. मिळालेल्या माहितीनुसार, काल कराडला जात असताना हा अपघात झाला. एअरबॅगमुळे त्यांना कोणतीही दुखापत झाली नाही. मात्र, त्यांच्या मर्सिडीज कारचे बरेच नुकसान झाले आहे. हा अपघात कशामुळे झाला याची माहिती मिळू शकली नाही.दरम्यान, विश्वजीत कदम यांनी अपघातानंतर या दुर्घटनेबाबत माहिती दिली. ते म्हणाले, मुंबईहून पुण्याला येत असताना माझ्या कारला काल रात्री पुण्यामध्ये अपघात झाला. कार झाडावर आदळली. सुदैवाने कोणतीही मोठी हानी झाली नाही. मी व चालक दोघेही सुखरूप आहोत. माझ्या डाव्या खांद्याला किरकोळ मार लागला आहे. सर्व वैद्यकीय चाचण्या करून घेतल्या असून कोणतीही गंभीर दुखापत झालेली नाही; तसेच कोणताही धोका नाही. साहेबांचे आशीर्वाद आणि आपल्या सर्वांच्या सदिच्छा पाठीशी आहेतच.

मी सुखरूप आहे काळजी नसावी. सांगलीतील पलुस कडेगाव मतदारसंघातून विश्वजीत कदम पुन्हा एकदा आमदारपदी निवडून आले आहेत. त्यांनी शिवसेनेचे उमेदवार संजय विभुते यांचा पराभव केला.विश्वजीत कदम यांनी राज्यात दुसऱ्या क्रमांकाचं सर्वाधिक मताधिक्य मिळवण्याचा विक्रम केला आहे. १ लाख ६२ हजार ५२१ इतकं मताधिक्य मिळवून कदम यांनी विजय मिळवला आहे.

# दहिसर येथील डीपी रोड खुला होणार

मुंबई, गुरुवार (प्रतिनिधी)-दहिसर (पूर्व )सुहासिनी पावसकर रोडकडून जाणारा रस्ता केतकीपाडा गणुबुवा कंपाऊंड रस्त्यास जोडणारा १८:३० मीटर आणि ५४०मीटर लांबीचा डी.पी.रस्ता येत्या ५ ते ६ महिन्यात खुला होणार असल्याने येथील वाहतूक कोंडी कमी होणार असून हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.पालिकेच्या आर/उत्तर विभागाच्या अंतर्गत प्रभाग क्र.३स्थानिक नगरसेवक बाळकृष्ण ब्रीद यांच्या पाठपुराव्यामुळे नवा डीपी रोड खुला होणार आहे.दहिसर (पूर्व) टोल नाक्याजवळ मधुबन सोसायटीकडे, दूरध्वनी एक्सेंज जवळ सदर रस्ता पश्चिम शहरी मार्गासमांतर असून येथील नागरिकांच्या सोयीचा आणि वाहतूक कोंडी मुक्त हा रस्ता असेल.सदर डी.पी रस्ता उपलब्ध झाल्याने रहिवाशांना यापुढे वाहन टोल भरावा लागणार नाही अशी माहिती नगरसेवक ब्रीद यांनी दिली.या रस्त्याचा कामाचे भूमीपूजन आमदार विलास पोतनीस, स्थानिक आमदार प्रकाश सुर्वे, नगरसेवक बाळकृष्ण ब्रीद यांच्या शुभहस्ते झाले.

# देवेंद्र यांनी २०० टक्के काम केले-

## अमृता फडणवीस यांचे मत

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी)-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोनशे टक्के देऊन काम केलं आहे, त्यांच्याएवढं काम भूतो न भविष्यति' कोणीही करु शकत नाही. सध्याच्या परिस्थितीला त्यांच्याइतका न्याय आणखी कोणी देऊ शकत नाही. हे भाजप पक्षाचे नेते आणि जनतेला ठाऊक आहे. सध्याच्या परिस्थितीत राज्याचं नेतृत्व करण्यासाठी भाजप सक्षम आहे, असे मत अमृता फडणवीस यांनी व्यक्त केलं. तसेच, शिवसेनेला भाजपसोबत जुळवून घेण्यास अपील करण्यासाठी मी योग्य व्यक्ती नाही, असंही त्या म्हणाल्या.

राज्यात सरकार स्थापनेवरुन भाजप आणि शिवसेनेत संघर्ष निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत अमृता फडणवीस यांनी देवेंद्र फडणवीस यांची पाठराखण केली. पुण्यात त्या एका खासगी कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलत होत्या.

IDBI BANK
आयडीबीआयबैंक लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: आयडीबीआय टॉवर, डब्ल्यूटीसी कॉम्प्लेक्स, कफ परेड, मुंबई - 05
सीआईएन: L65190MH2004GOI148838

संपूर्ण भारतातील बँकांच्या शाखांसाठी स्ट्राँग रुम दरवाजे, सुरक्षित जमा लॉकर व अन्य भौतिक सुरक्षा सामग्री यांच्या खरेदीसाठी विक्रेत्यांची पूर्व अर्हता/पात्रता

वरील कामांसाठी उत्पादकांकडून पूर्व अर्हता/पात्रता या हेतूने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख 25 नोव्हेंबर 2019, दुपारी 3:00 वाजेपर्यंत आहे. अधिक माहितीसाठा कृपया बँक वेबसाइट www.idbibank.in ला भेट द्या.
पुढील कोणत्याही परिशिष्ट/शुद्धिपत्र/स्पष्टीकरण/पुढील संदर्भात निविदाकरांच्या प्रश्नांना स्पष्टीकरण/प्रतिसाद निविदा केवळ आमच्या बँकेच्या वेबसाईट www.idbibank.in वर पोस्ट केली जाईल. वृत्तपत्रांत स्वतंत्र अधिसुचना जारी केली जाणार नाही. स्वत:ला अद्यावत ठेवण्यासाठी आमच्या वेबसाईटला नियमित भेट द्यावी.
तारीख: 08 नोव्हेंबर 2019
उपमहाप्रबंधक (आयएमडी)

# युवासेनेच्या शिष्टमंडळाने घेतली राज्यपालांची भेट

मुंबई, गुरुवार (प्रतिनिधी)- युवासेनेच्या शिष्टमंडळाने आज राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांची भेट घेऊन पूर व अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याची मागणी केली.

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे तसेच त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांचे या वर्षीचे शैक्षणिक शुल्क माफ करावे, अशी नम्र विनंती युवासेनेच्या शिष्टमंडळाने राज्यपालांना केली.

महाराष्ट्रात आलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क भरणे कठीण झाले आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून युवासेनेच्या मागणीवर कार्यवाही करण्याची विनंती राज्यपालांना केली.

TATA

TATA STEEL LIMITED
Registered Offce: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेली तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

| तपशिल | ३०.०९.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१९ रोजी संपलेले सहा महिने | ३०.०९.२०१८ रोजी संपलेले सहा महिने | ३१.०३.२०१९ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | १४,८७१.१८ | १६,०९१.३२ | १७,९०२.०४ | ३०,९६२.५० | ३४,३०७.५० | ७०,६१०.९२ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | १,८९१.३७ | २,४४३.९० | ५,०४३.७५ | ४,३३५.२७ | ८,९५१.६१ | १६,३४१.४८ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | १,८८८.७९ | २,४०३.१५ | ५,०१५.५६ | ४,२९१.९४ | ८,५८८.७३ | १६,२२७.२५ |
| कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ३,८३७.८१ | १,५३८.९९ | ३,२६७.८६ | ५,३७६.८० | ५,५८६.०१ | १०,५३३.१९ |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ३,७५९.८४ | १,४८९.४३ | ३,२६१.३६ | ५,२४९.२७ | ५,६०१.९८ | १०,४८२.९७ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ | १,१४६.१२ |
| पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव | | | | | | ६९,३०८.५९ |
| नेटवर्थ | | | | ७६,०९१.९४ | ६७,९३४.२४ | ७२,७२९.७१ |
| भरणा झालेले कर्ज भांडवल | | | | १२,२९६.७८ | १०,४३८.९३ | १४,३४६.४१ |
| निव्वळ कर्ज इक्विटी गुणोत्तर | | | | ०.४० | ०.३५ | ०.४२ |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ३३.०० | १३.०५ | २८.१४ | ४६.०५ | ४७.९९ | ९०.४१ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ३३.०० | १३.०५ | २८.१३ | ४६.०५ | ४७.९८ | ९०.४० |
| डिबेंचर विमोचन राखीव | | | | २,०४६.०० | २,०४६.०० | २,०४६.०० |
| डेब्ट सर्व्हिस कव्हरेज गुणोत्तर | | | | १.५४ | ८.८१ | ६.२३ |
| इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज गुणोत्तर | | | | ४.७० | ११.६५ | ९.५७ |

३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेली तिमाही/सहा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

| तपशिल | ३०.०९.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३०.०६.२०१९ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१८ रोजी संपलेली तिमाही | ३०.०९.२०१९ रोजी संपलेले सहा महिने | ३०.०९.२०१८ रोजी संपलेले सहा महिने | ३१.०३.२०१९ रोजी संपलेले आर्थिक वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| प्रवर्तनातून एकूण महसूल | ३४,५७९.१८ | ३५,९४७.११ | ४०,८९७.१६ | ७०,५२६.२९ | ७६,३९१.२४ | १,५७,६६८.९९ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी) | २७.०२ | १,८०३.०१ | ५,२४७.३३ | १,८३०.०३ | ८,५९४.७६ | १६,०२६.६९ |
| कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर) | (६.५४) | १,८१९.०१ | ५,४११.१० | १,८१२.४७ | ८,४२९.८९ | १५,९०५.७२ |
| अखंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | ४,०४३.४५ | ६९५.१९ | ३,०९४.३२ | ४,७३८.६४ | ५,०१७.१७ | ९,१८७.२९ |
| खंडित प्रवर्तनातून करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) | (७४१.१४) | १८.८४ | २१.८८ | (७२२.३०) | ३२.८३ | (८८.९६) |
| कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/ (तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ४,४८३.११ | ३८८.२३ | १,३०५.४५ | ४,८७१.३४ | ४,९८६.४७ | ९,१०६.१२ |
| भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग) | १,१४४.९४ | १,१४४.९४ | १,१४४.९३ | १,१४४.९४ | १,१४४.९३ | १,१४४.९४ |
| राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रित व्याज | | | | | | ६७,८६९.६० |
| नेट वर्थ | | | | ७५,३०३.०२ | ६७,६०५.४१ | ७१,२८९.५४ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ३५.७१ | ५.७३ | ३०.८८ | ४१.४५ | ४७.४५ | ८८.३२ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | ३५.७१ | ५.७३ | ३०.८७ | ४१.४४ | ४७.४४ | ८८.३१ |
| प्रति समभाग प्राप्ती (अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी) : | | | | | | |
| प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २९.२५ | ५.८८ | ३१.०७ | ३५.१४ | ४७.७३ | ८७.७५ |
| प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर) | २९.२५ | ५.८८ | ३१.०६ | ३५.१३ | ४७.७२ | ८७.७४ |

टीपा :
ए) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही/सहा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.
बी) सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ५२ (४) च्या पोट-खंड (ए), (बी), (डी) व (ई) मध्ये उल्लेख केलेल्या बाबींसाठी महत्त्वाची माहिती एनएसई आणि बीएसई (www.nseindia.com/www.bseindia.com) ला दिली आहे आणि ती युआरएल (www.tatasteel.com) वर पाहता येईल.

टी. व्ही. नरेंद्रन
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक
मुंबई : ०६ नोव्हेंबर, २०१९

कौशिक चॅटर्जी
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

TATA STEEL

# नवशक्ति 'ज्ञानशक्ति' दहावी मार्गदर्शन

**MATHEMATICS (PART II)**
**Ganesh Rewdekar**

**Q.7. Choose the correct alternative and answer the following questions :**

(i) $\sin\theta = \frac{4}{5}$ and $\cos\theta = \frac{3}{5}$ then $\tan\theta$ = .......... .

**(a)** $\frac{4}{3}$ (b) $\frac{3}{4}$ (c) $\frac{12}{25}$
(d) cannot be calculated

(ii) If $\sin\theta = \frac{24}{25}$ then $\cos\theta$ = .......... .

(a) $\frac{\sqrt{24}}{5}$ (b) $\frac{25}{24}$ (c) $\frac{25}{7}$ **(d)** $\frac{7}{25}$

(iii) If $\mathrm{cosec}\theta = \frac{2}{\sqrt{3}}$ then $\theta$ = .......... .

(a) 0 (b) 45 (c) 30 **(d) 60**

(iv) If $(\sec\theta - 1)(\sec\theta + 1) = \frac{1}{3}$ then $\cos\theta$ = .......... .

(a) $\frac{1}{2}$ (b) $\frac{1}{\sqrt{2}}$ **(c)** $\frac{\sqrt{3}}{2}$ (d) $\frac{\sqrt{2}}{3}$

(v) When we see at a lower level from the horizontal line, angle formed is .......... .
(a) Angle of elevation
**(b) Angle of Depression**
(c) 0 (d) Straight Line

**Q.8. If $\tan\theta = 1$ then complete the following activity to find $\cos\theta$.**

**Ans. :**

$1 + \tan^2\theta = \boxed{\sec^2\theta}$

$1 + (1)^2 = \boxed{\sec^2\theta}$

$2 = \boxed{\sec^2\theta}$

Taking positive square root

$\boxed{\sec\theta} = \sqrt{2}$

Since

$\cos\theta = \boxed{\frac{1}{\sec\theta}}$

$\therefore \cos\theta = \frac{1}{\sqrt{2}}$.

**PRACTICE EXAMPLES :**

1. If $\left(\sqrt{1 + x^2}\right)\sin\theta = x$ then prove that : $\tan^2\theta + \cot^2\theta = x^2 + \frac{1}{x^2}$.
2. Prove : $(\sin A + \mathrm{cosec} A)^2 + (\cos A + \sec A)^2 = 7 + \tan^2 A + \cot^2 A$
3. From the top of a light house, 80 metres high two ships on the same side of light have are observed. The angles of depression of the ships as seen from the light house are found to be of $45^0$ and $30^0$. Find the distance between the two ships . assume that the two ships and the button fo the lighthouse are in a line.
**Ans. : $80\left(\sqrt{3} - 1\right)$ m**
4. If $x = r\cos\theta$ and $y = r\sin\theta$. Prove $x^2 + y^2 = r^2$.
5. Eliminate $\theta$; $x = 2\mathrm{cosec}\theta$, $y = 3\cot^2\theta$.
**Ans. : $\frac{x^2}{4} - \frac{y^2}{9} = 1$**
6. **Complete the following activity to prove :** $\frac{\sin^2\theta}{\cos\theta} + \cos\theta = \sec\theta$.

**Activity :**

L.H.S. $= \frac{\sin^2\theta}{\cos\theta} + \cos\theta$

$= \frac{\sin^2\theta + \square}{\square}$

$= \frac{\square}{\cos\theta}$ from identify

$= \square$

= R.H.S.

$\therefore \frac{\sin^2\theta}{\cos\theta} + \cos\theta = \sec\theta$.

7. The angle of elevation of a cloud from a point 60 m above a late is $30^0$ and the angle of depression of the reflection of the cloud in the lake is $60^0$. Find the height of the cloud from the surface of the lake.
**Ans. : 120 m**

Continue ... Next Article

STD 8th - 9th - 10th
ENGLISH & SEMI ENGLISH
11th - 12th SCIENCE
ENGINEERING / MEDICAL / PHARMACY
11th - 12th COMMERCE
CA FOUNDATION
studyplus
EDUCATION INSTITUTE
LALBAUG BRANCH: +91 8655031231 / +91 7208010322
KALACHOWKI BRNACH: +91 8655031239